● मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १९३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### वाळुमाफियांकडून हल्ल्याविरोधात महसुल अधिकारी-कर्मचारी आक्रमक

## पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह!

### पोलीस प्रशासनाचा निषेध; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील घनसावंगी तालुक्यातील दैठणा बुद्रुक गावात वाळू माफियांवर कारवाईसाठी गेलेल्या महसूल पथकातील अधिकाऱ्यांवर वाळू माफियांनी हल्ला केला. तर जाफ्राबाद तहसीलदारांच्या गाडीवर वाळू माफियांनी हल्ला केला. या प्रकरणी पोलिसांनी माफियांवर कोणतीही कारवाई केलेली नाही.त्याच्या निषेधार्थ सोमवार (दि १०) रोजी पोलीस प्रशासनाचा निषेध नोंदवत जालना जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. प्रशासनातील एका विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाच पोलीस प्रशासनाविरोधात निषेध व्यक्त करावा लागत असल्यामुळे पोलीसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांना शस्त्रधारी संरक्षण द्या, तरच अवैध खनिज उपसा आणि वाहतुकीविरोधात कारवाई करू, असा ईशारा महाराष्ट्र राज्य तहसीलदार आणि नायब तहसीलदार संघटनेने दिला. यावेळी महसूल संघटनेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, जालना जिल्हयामध्ये गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतुक प्रतिबंधक पथकावर वाळू माफीयांकडून सशस्र हल्ले होत आहेत. मागील काही दिवसांमध्ये जालना जिल्हयामध्ये गौण खनिज प्रतिबंधक कारवाई करत असतांना पथकातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांचेवर वाळू माफीयांकडून जीवघेणे हल्ले झाले आहेत. मागील तीन महिन्यामध्ये जिल्हयात अशा स्वरुपाचे पाच हल्ले झाले आहेत, त्या घटना पुढीलप्रमाणे दिनांक ०८.०२.२०२५ रोजी तहसिलदार जाफ्राबाद स्वतः पथकासह त्यांच्या वाहनातून राजूर ते टेंभुर्णी या मार्गावरील देळेगव्हाण पाटीजवळ अवैध वाळूने भरणा असलेल्या हायवास प्रतिबंध करण्यास गेले असता, संबंधीत हायवा चालक यांनी घातपात करण्याच्या दृष्टीने तसेच जीवे मारण्याच्या हेतूने सदरील हायवा न थांबवता तहसिलदार मॅडम श्रीमती सारीका भगत यांच्या बाहनावर चाल करुन, जीवे मारण्याचा प्रयत्न केला व त्यांच्या खाजगी वाहनास धडक देऊन नुकसान केले. तसेच संबंधीत हायता चालकाने पथकात असलेले नायब तहसिलदार श्री दत्ता पेरके यांना धक्काबुक्की करुन सदरील हायवा पळवून नेला. सदरील वाहत चालक व मालक यांच्या नावासह टेंभुर्णी पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल असतांना अद्यापही आरोपी यांना



अटक करण्यात आली नाही.

दिनांक ०६.०२.२०२५ रोजी मंडळ अधिकारी श्री पी डी शिंदे यांच्या पथकाने मौजे दैठणा बुद्रुक तालुका घनसावंगी हद्दीत गौण खनिज प्रतिबंधक कारवाई करत असताना हायवा पकडला असता, त्यावेळी वाळू माफीयांनी पथकावर हल्ला केला व दगडफेक केली या हल्ल्यामध्ये मंडळ अधिकारी श्री पी डी शिंदे यांच्या डाव्या खांद्याच्या हाडाला लोखंडी रॉड लागून फॅक्चर झाले आहे. त्यांचा उपचार संजीवनी हॉस्पिटल अंबड येथे सुरू आहे. पथकामध्ये एकूण आठ कर्मचारी असतांना देखील १० ते १५ बाळु माफिया घटनास्थळी जमा होऊन, अवैध वाळु असलेला हाथवा पळवून नेला, सदरील घटनेचा FIR करण्यात आला असून, आरोपींना अद्याप अटक करण्यात आली नाही.

तसेच मागील ३ महिन्यापुर्वी बदनापूर तालुक्यामध्ये रात्रीचे वेळी गौण खनिज प्रतिबंधक पथकामध्ये असतांना मंडळ अधिकारी श्री.बी. बी. भार्डीकर व तलाठी श्री. दुर्गमवार यांचेवर दगडाने जीवघेणा हल्ला केला आहे ज्यामध्ये मंडळ अधिकारी श्री.बी.बी. भार्डीकर यांना नाकावर दगड लागुन नाकाची नस फाटली आहे ही गंभीर स्वरुपाची इजा आहे. ज्यामुळे त्यांना सद्याला ऐकण्यास कमी येत आहे. ही गंभीर स्वरुपाची जखम असून त्यामुळे ते अधू झाले आहेत.

दिनांक १३.१२.२०२४ रोजी मंठा तालुक्यातील मौजे तळणी येथे गौण खनिज अवैध वाहतुक प्रतिबंध पथकातील तलाठी श्री. परमेश्वर जंगाले व श्री. वैजिनाथ रूद्रे यांनी वाळूची अवैध वाहतुक करणारा हायवा पकडून तहसिल कार्यालयाकडे घेऊन जात असतांना हायवा मालक श्रीमती अर्चना राऊत व श्रीमती जिजाबाई शिंदे यांनी तलाठी श्री. परमेश्वर जंगाले यांना हायवा मधुन ओढून खाली पाडले व शिवीगाळ करुन मारहाण केली. तसेच विनयभंगाचा दाखल करील अशी धमकी दिली.

अशाच प्रकारचा हल्ला दिनांक २४.१२.२०२४ रोजी जाफ्राबाद तालुक्यात नायब तहसिलदार श्री. मंगेश साबळे व तलाठी आय. के. पठाण यांचेवर करण्यात आला. आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

माहे २०.०४.२०२४ रोजी ग्राम महसुल अधिकारी **पान २ वर**

## भागवत कथेच्या श्रवणाने जन्म सत्कारणी लागतो - हभप आढावणे महाराज

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** प्रत्येकाने जीवनात भागवत कथेत श्रवण व आचरण करून दोन्ही जिवनांचे सार्थक करून घ्यावे असे आवाहन भागवताचार्य संतोष महाराज आढावणे यांनी केले टेंभुर्णी येथील संत सावता मंगल कार्यालाय १ पेपर वारी पासून सुरू झालेल्या संगीतमय श्रीमद् भागवत कथेत भगवान श्रीकृष्णाने गीतेच्या माध्यमातून मानवाला जीवन जगण्याची कला शिकवली आहे त्यात संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचे गुपित घडले आहे भगवान श्रीकृष्ण जन्म सोहळा ही ब्रह्मांडातील एक रहस्यमय



घटना असल्याचेही महाराजांनी सांगितले बुधवारी कथेच्या पाचव्या दिवशी श्री कूष्ण जन्म सोहळा साकारण्यात आला यावेळी वासुदेव जानकी आणि बाळ श्रीकृष्णाचे जिवंत देखावे सर्वांना मोहून गेले महाराजांच्या सुमधूर स्वरातुन गायली जात असलेली ही कथा श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत आहे कथेचा सामारोप शुक्रवारी महाप्रसादाने होणार आहे या कथेच्या आयोजनासाठी निशा जैस्वाल हर्ष जैस्वाल रुद्रांश जयस्वाल संदीप जयस्वाल प्रदीप जयस्वाल आदी पुढाकार घेत आहे यावेळी पंचक्रोशीतील भाविकांची कार्यक्रमास उपस्थित होती.

## योग्य नियोजनासह सकारात्मकतेने परीक्षांना सामोरे जा - पंतप्रधान मोदी

**मुंबई -** जीवनात स्वतःशी स्पर्धा ठेवून प्रत्येक क्षण सकारात्मकतेने जगा. आत्मविश्वास वाढण्यासाठी वेळेचे योग्य नियोजन करा, उद्दिष्टांचे लहान लहान टप्पे करुन ते पूर्ण केल्याचा क्षण साजरा करा. तसेच परीक्षांचा ताण न घेता अभ्यासावर लक्ष केंद्रित करा, त्यातून नक्की यश मिळेल, असा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी नवी दिल्ली येथे शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या मुंबईत शिवाजी पार्क येथील स्काऊट आणि गाईडच्या सभागृहात झालेल्या प्रसारण कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्यासह विविध शाळांमधील विद्यार्थी उपस्थित होते.

प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा हेच अंतिम ध्येय न ठेवता सर्वांगीण ज्ञान मिळविण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करावा. स्वतःला **पान २ वर**



### चुकीच्या पद्धतीने आकारलेले वीज बिल ग्राहक तक्रार निवारण आयोगाने ठरवले रद्द

## ग्राहकास सात हजाराची नुकसान भरपाई देण्याचे महावितरणला आदेश

**जालना । प्रतिनिधी -** कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित करण्यात आलेल्या जुन्या मीटरवर चुकीच्या पद्धतीने आकारण्यात आलेली १ लाख १८ हजार रुपयाची थकबाकी नवीन वीज जोडणीवर वळती न करण्याचे आदेश जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने महावितरणला दिले असून, नुकसान भरपाई म्हणून सात हजार रुपये वीज ग्राहकास देण्यात यावेत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. या निर्णयामुळे अन्य ग्राहकांवर होणाऱ्या अन्यायकारक वीज बिल वसुलीला आळा बसेल, असा विश्वास ॲड. महेश सिताराम धन्नावत व्यक्त केला आहे.

या प्रकरणाची अधिक माहिती अशी की, महावितरण कंपनीने किशोर गोपीकिशन बगडीया यांचा वीज पुरवठा सन २०१८ मध्ये कायमस्वरूपी खंडित केला होता. त्यानंतर त्यांनी नवीन वीज जोडणी घेतली होती. सन २०२४ मध्ये महावितरणने कायमस्वरूपी खंडीत वीज मीटरवरील १ लाख १८ हजार ३०० रुपयाची थकबाकी भरण्याची मागणी केली होती. तसेच, सदर रक्कम न भरल्यास त्यांचे चालू वीज मीटर बंद करण्याचा इशारा देण्यात आला. या चुकीच्या मागणीविरोधात श्री. किशोर बगडीया यांनी ॲड. महेश धन्नावत यांच्यामार्फत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात तक्रार दाखल केली.

ॲड. महेश धन्नावत यांनी ग्राहक आयोगासमोर पुराव्यानिशी स्पष्ट केले की, जुन्या मीटरवरील थकित वीज बिलाची रक्कम सन २०१८ मध्ये श्री. बगडीया यांनी महावितरणला धनादेशाद्वारे अदा केली होती. मात्र, काही धनादेश अनादरित झाल्यानंतर सप्टेंबर २०१८ मध्ये त्यांनी पुन्हा रु. ८९,८५० भरले होते. तरीही महावितरणने त्यांच्याकडून पुन्हा जुन्या बिलाची मागणी करणे चुकीचे आहे. विद्युत कायदा कलम ५६(२) नुसार थकबाकीची रक्कम सातत्याने थकबाकी म्हणून दर्शवली नसल्यास दोन वर्षांपेक्षा जुनी थकबाकी वसूल करता येत नाही. या कायद्यानुसार सन २०१८ मधील बिलाची रक्कम महावितरण वसूल करू शकत नाही, अस ॲड. धन्नावत यांनी निदर्शनास आणून दिले.

सदर प्रकरणाचा सर्व बाजूंनी विचार करून जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दिलेल्या निर्णयात महावितरणची १ लाख १८ हजार ३०० रुपयाची मागणी अयोग्य ठरवली आणि ते बिल रद्द केले. तसेच, महावितरणने तक्रारदाराच्या नवीन वीज जोडणीवर जुन्या बिलाची रक्कम वळवू नये तसेच श्री. बगडीया यांना झालेल्या मानसिक आणि शारीरिक त्रासासाठी ३ हजार रुपये आणि तक्रारीच्या खर्चासाठी ४ हजार अशी एकूण ७ हजार रुपयाची भरपाई देण्याचे आदेश आयोगाने महावितरणला दिले. या निर्णयामुळे विद्युत वितरण कंपनीच्या चुकीच्या बिल वसुलीला आळा बसेल आणि ग्राहकांना न्याय मिळेल, असा विश्वास ॲड. महेश धन्नावत यांनी व्यक्त केला.

## राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या उपाध्यक्षपदी प्रा. रवींद्र जिगे

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाची राज्य कार्यकारिणीची निवडणूक नुकतीच पुणे येथे संपन्न झाली असून, अध्यक्षपदी नाशिकचे प्रा.संजय शिंदे तर उपाध्यक्षपदी देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजी नगरचे प्रा. रवींद्र जिगे पाटिल यांची निवड करण्यात आली.



प्रा. रवींद्र जिगे पाटील हे मूळचे जालना जिल्ह्यातील भूमिपुत्र असून मठपिंपळगाव येथील आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल जालना जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आनंद झाला आहे. राज्य शासनाच्या मराठी भाषा समितीचे सदस्य प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे पाटील, ज्युक्टा कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुग्रीव वासरे, सचिव प्रा.परशुराम चौरे, उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड,डॉ.फुलचंद मोहिते, डॉ. अरविंद महाजन, डॉ. स्वप्नील सारडा, प्रा.समाधान पवार, प्रा.शिवनारायण ताठे, प्रा. महेश सोनी, प्रा. विजय शिंदे, प्रा. संतोष मुंदडा,प्रा.जगदीश मुळे, आदींनी स्वागत केले आहे. प्रा. रवींद्र जिगे पाटील यांची उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जालना जिल्ह्यातून शिक्षक वर्गातून आनंद व्यक्त होत आहे.

## जिल्ह्यातील विविध कार्यालयांसाठी एक दिवसीय सायबर जागरुकता कार्यशाळा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, सर्व उपविभागीय कार्यालये तसेच शासकीय तंत्रनिकेतनमध्ये सायबर जनजागृतीसाठी एक दिवसीय सायबर जागरुकता कार्यशाळेचे आयोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले.



टुगेदर फॉर अ बेटर इंटरनेट या थीम अंतर्गत जिल्ह्यात सेफ इंटरनेट डे साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने देशभर विविध स्तरावर सायबर जागरूकता अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या इन्फॉर्मेशन सेक्युर्टी एज्युकेशन अवेरनेस यांच्या (https://isea.gov.in) या संकेतस्थळावर सायबर जागृती, सायबर सुरक्षा, सायबर स्वच्छता आदि मुद्यांवर जागरुकतेसंदर्भात सर्व माहिती उपलब्ध आहे. या माहितीचा उपयोग करून आपल्या कार्यालयात कार्यशाळेचे आयोजन आपल्या स्तरावर करावे. तसेच या कामी काही अडचण असल्यास जालना येथील जिल्हा सूचना केंद्राचे जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. जालना येथील कार्यालयांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात दि. ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सायबर जागरूकता कार्यशाळेचे आयोजन केले आहे. तरी जिल्हाधिकारी कार्यालयामधील सर्व विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेस उपस्थित रहावे. अशा सुचनाही देण्यात आलेल्या आहेत.

सर्व विभागांनी आपापल्या स्तरावर या कार्यशाळचे आयोजन करुन सहभाग घ्यावा आणि या उपक्रमातून मिळणाऱ्या तांत्रिक मार्गदर्शनाचा योग्य लाभ घ्यावा, जेणेकरून आपल्या मार्फत देण्यात येणाऱ्या ई-गव्हर्नन्स सेवांची सायबर सुरक्षितता राखण्यास मदत होईल. तसेच आपल्या विभागात, कार्यालयात कार्यशाळा आयोजन केल्याबाबतचे छायाचित्र व्हिडीओसह जिल्हा सुचना विज्ञान केंद्र कार्यालयाच्या ई-मेल mahjalnic.in वर सादर करावेत. असेही कळविले आहे.

# संपादकीय

पान

## डेज संस्कृतीमुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा!

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरा करण्याचे त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोज डे पासून सुरू झालेला हा डेज चा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, प्रॉमिस डे, टेडी डे, चॉकलेट डे, हग डे, किस डे असे विविध प्रकारचे डे येतात. डेज चा हा महोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीला गुलाबाचे फुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण येत असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेज च्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त का लागतो ? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील हास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त असावा असे काही नाही. मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत. माझ्यामते कोणावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांना भेटवस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्चर्यचकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डे ची गरज नसते. बरे हे डे पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात तर डेज चे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, सिस्टर्स डे, ब्रदर्स डे, डॉटर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अति झाले नि हसू आले अशी गत या डेज ची झाली आहे. सोशल मीडियावर क्टीव असणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडतो. वर्षभर कधी आई वडीलांप्रती आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप क्टीव असतात. जन्मदात्या आई वडिलांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डे ची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमूल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेज ची गरज आहे का ? असा प्रश्न प्रत्येकाने विचारून पहावा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## समाज कल्याण कार्यालयाकडून लोकशाही दिन

**जालना -** येथील समाज कल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अडचणी संदर्भात तसेच या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय वसतिगृह किंवा शासकीय निवासी शाळेमध्ये पुरविण्यात येणाऱ्या सोईसुविधांविषयी असणाऱ्या समस्या, तक्रारींचे निराकरण करण्यासाठी समाज कल्याण कार्यालयात दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी संबधिताने आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात घेऊन सकाळी ११ ते १२ या वेळेमध्ये उपस्थित रहावे, असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागासाठी १०० दिवसाचा कृती आराखडा निश्चित केला आहे. त्यामध्ये संकेतस्थळ, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारीचे निवारण, कार्यालयातील सोई-सुविधा, गुतंवणूक प्रसार व क्षेत्रीय कार्यालयाला भेटी यामुद्द्यावर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य समाज कल्याण आयुक्तालयाने शासन निर्णयात दिलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने जनतेच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी सहायक आयुक्त स्तरावर लोकशाही दिनाच्या आयोजन करावे असे निर्देश दिले आहेत. असेही कळविले आहे.

# एकात्म मानवतावाद; सुशासनासाठी भारताचा मौलिक दृष्टिकोन

आज स्वातंत्र्यप्राप्त भारत अमृत काळाच्या उंबरठ्यावर उभा असला तरी संपूर्ण जग अनिश्चिततेच्या वळणावर उभे आहे. या पार्श्वभूमीवर, नेहमीच सर्वसमावेशक आणि निसर्ग केंद्रित प्रगती साध्य करण्याचा दृष्टिकोन स्वीकारणारा भारत, आज संपूर्ण जगासाठी शाश्वत विकासाचा आदर्श ठरत आहे. निसर्गाकडे केवळ एक संसाधन म्हणून पाहणाऱ्या पाश्चिमात्य संस्कृतीला आज उत्तरं सापडत नाही. समाजवाद, साम्यवाद आणि भांडवलशाही यांसारख्या मतप्रणालींमध्ये अडकलेले व्यवस्थापन कोसळत आहेत किंवा अंतर्गत व बाह्य संघर्षात गुरफटले आहेत.

भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी, देश देखील अशाच एका द्विधा स्थितीत होता. तत्कालीन सत्ताधाऱ्यांना भारताच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजांना साजेसा विकासाचा मार्ग ठरवता आला नाही आणि ते या तिन्ही विचारसरणींमध्ये हेलकावत राहिले. अशा परिस्थितीत, एका दूरदर्शी विचारवंताने एकात्म मानवतावाद या चिरंतन तत्त्वज्ञानाचा प्रस्ताव मांडला. हा विचार मांडणारे होते पंडित दीनदयाळ उपाध्याय, जे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (ठड्ड) प्रचारक आणि भारतीय जनसंघाचे (आजच्या भारतीय जनता पक्षाचे) संस्थापक सदस्य होते. परंतु त्यांनी वारंवार स्पष्ट केले की हा विचार त्यांनी निर्माण केलेला नसून, तो भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेची शिकवण आहे. सनातन संस्कृतीमध्ये रुजलेलं हे तत्त्वज्ञान आजही तितकंच सुसंगत आहे. त्यांच्या ५७ व्या पुण्यतिथीनिमित्त, ११ फेब्रुवारी रोजी, या आधुनिक ऋषीच्या योगदानाला आपण स्मरुया.

**सर्वसमावेशक मानवी विकासाची दृष्टी**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी, त्यांच्या लहानशा पण प्रभावी आयुष्यात जगाला एक मार्गदर्शक तत्त्व दिलं-ते म्हणजे, माणसाला तुकड्यांत विभागून नव्हे, तर संपूर्णतेने पाहिलं पाहिजे. म्हणजेच शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा समतोल साधत मानवाचा विचार केला पाहिजे. तसेच संपूर्ण विश्व एकमेकांशी जोडलेलं आहे, याची जाणीव ठेवली पाहिजे. पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश या पंचतत्त्वांची परस्परपूरक समज विकसित करून त्यानुसार मानवी कृती घडल्या पाहिजेत. निसर्गाचा सन्मान आणि त्याचे संवर्धन हे आपल्या जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग असले पाहिजे.

संयुक्त राष्ट्रसंघाने (UN) पंडित दीनदयाळ उपाध्याय किंवा त्यांच्या तत्त्वज्ञानाला औपचारिक मान्यता दिलेली नसली, तरी २५ सप्टेंबर २०१५ रोजी स्वीकारलेल्या १७ सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स (SDGs) हे एकात्म मानवतावादाचे प्रतिबिंब आहेत. योगायोग म्हणजे, याच दिवशी त्यांचे जन्मशताब्दी वर्ष देखील सुरू झाले होते. एकात्म मानवतावाद हा मानवकेंद्री विचार असून पंडित दीनदयाळ उपाध्याय मानत की, जसा व्यक्तीला आत्मा असतो, तसाच राष्ट्रालाही चिती म्हणजेच राष्ट्रीय चेतना असते. त्यांच्या मते, भारताचा आत्मा त्याच्या गावांमध्ये आहे आणि खऱ्या अर्थाने हा ग्रामीण समाजच राष्ट्राचे अन् आत्म्याचे रक्षणकर्ते आहेत. त्यामुळे संपूर्ण देशाचा विकास हा केवळ ग्रामविकासाद्वारेच साध्य होऊ शकतो.

ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी, त्यांचे निकटवर्तीय नानाजी देशमुख यांनी दीनदयाळ रिसर्च इन्स्टिट्यूट (ऊठख) ची स्थापना केली. सर्वांगीण ग्रामीण विकासासाठी कार्य करणाऱ्या या संस्थेने गोंडा, बीड आणि चित्रकूट येथे विकास प्रकल्प राबवत स्थानिक ज्ञान आणि आधुनिक उपाय यांचा संगम घडवला. या कार्याच्या गौरवार्थ नानाजी देशमुख यांना २०१९ मध्ये भारतरत्न प्रदान करण्यात आला.

विचारवंत, नेते आणि मार्गदर्शक पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय जनसंघाचे सिद्धांतकार आणि संघटनात्मक मार्गदर्शक होते. १९५२ साली जनसंघाच्या स्थापनेपासून ते १५ वर्षे सरचिटणीस राहिले, आणि डिसेंबर १९६७ साली त्यांनी अध्यक्षपद भूषवले. त्यांच्या नेतृत्वाखाली जनसंघाने भारतीय राजकारणात मजबूत पाया रचला. मात्र, केवळ ५१ व्या वर्षी, गूढ परिस्थितीत त्यांचे अकाली निधन झाले.

त्यांचा अभ्यास केवळ भारतापुरता सीमित नव्हता; ते जागतिक आर्थिक-सामाजिक घडामोडींवरही नजर ठेवून होते. त्यांच्या भाषणांमधून त्यांनी भारतीय जनतेला आत्मसन्मान जपण्यास प्रेरित केलं. त्यांनी मार्गदर्शन केलं की परिश्रम, धर्म (कर्तव्य), अर्थ (समृद्धी), काम (इच्छापूर्ती) आणि मोक्ष (अंतिम मुक्ती) या चार पुरुषार्थांचा योग्य समतोल राखून जीवन जगावं. त्यांनी भारतीय संस्कृतीला धरून प्रगतीचा मार्ग आत्मसात करण्यास सांगितले. भारतीय समाजाला नेहमीच देशानुकूल आणि युगानुकूल विचारसरणी स्वीकारण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**भारतासाठी पुढील मार्ग**

आज भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश म्हणून आपली हरवलेली सभ्यतावादी वैशिष्ट्य पुन्हा प्रस्थापित करू पाहत आहे. ऐतिहासिक भान, संस्कृती आणि परंपरा यांना आत्मसात करून भारत विकासाची नवी परिभाषा जगासमोर मांडण्याचे उद्दिष्ट बाळगतो. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी विचारलं होतं की, आंतरराष्ट्रीय संस्था आणि परदेशी संस्थांनी भारताचा विकासदर, साक्षरता किंवा आरोग्य परिस्थिती का ठरवावी? जर भारताने स्वतःचे मापदंड ठरवले नाहीत, तर बाहेरून आलेल्या शक्ती आपली मते लादत राहतील, हे त्यांनी अनेक वर्षांपूर्वीच ओळखलं होतं.

आजचा भारत एकात्म मानवतावाद या तत्त्वज्ञानाला आत्मसात करून 'अंत्योदय' - म्हणजेच समाजातील शेवटच्या माणसाच्या उत्थानावर भर देणारी धोरणं राबवतो आहे. केंद्र आणि विविध राज्य सरकारांच्या योजनांमध्ये त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनाचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. गरीबांसाठी कल्याणकारी योजना असोत, संरक्षणातील आत्मनिर्भरता असो, की अंतराळ संशोधनातील यश - भारताची वाढती ताकद त्यांच्याच विचारसरणीची प्रचीती आहे.

त्यांच्या विचारसरणीने भारताला एका कमकुवत आणि संभ्रमित राष्ट्रातून एक आत्मसन्मान आणि आत्मनिर्भरतेचा आदर्श घडवला आहे. आजचा भारत एका उज्ज्वल भविष्याच्या दिशेने दिमाखात वाटचाल करत आहे.

**-मंगल प्रभात लोढा**
**मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, महाराष्ट्र सरकार**

# देविदास श्रावण नाईकरे; व्यवसाय आणि अध्यात्म यांचे अनोखे संमिश्रण

देवदास श्रवण नाईकरे हे व्यवसाय आणि अध्यात्म या दोन्ही क्षेत्रांतील एक सुप्रसिद्ध नाव आहे. भारतातील अग्रगण्य व्यवसाय कोचपैकी एक म्हणून, ते लोकांना व्यवसायात यश मिळवण्यास मदत करतात आणि त्याचबरोबर मानसिक आणि आध्यात्मिक वाढीवर लक्ष केंद्रित करण्याचे मार्गदर्शन करतात. देवदास ग्रुप ऑफ कंपनी चे संस्थापक म्हणून, त्यांनी व्यवसायातील कौशल्ये आणि गहन आध्यात्मिक समज यांचे अनोखे संयोग घडवले आहेत.

१९ वर्षांच्या अनुभवासह, श्री. नाईकरे यांनी हे सिद्ध केले आहे की व्यवसायिक धोरणांना मानसिक प्रशिक्षण आणि आध्यात्मिकतेसह जोडल्यास आश्चर्यकारक यश मिळू शकते. ते एक प्रसिद्ध लेखक देखील आहेत, ज्यांनी दोन भाषांमध्ये १२ प्रेरणादायी पुस्तके लिहिली आहेत. या पुस्तकांच्या माध्यमातून असंख्य व्यावसायिकांना वैयक्तिक आणि व्यवसायिक प्रगतीस मदत झाली आहे.

श्री. नाईकरे यांचे ज्ञान हे पाच प्रतिष्ठित गुरूंकडून शिकलेल्या शिकवणीतून आले आहे. त्यांचे मार्गदर्शन हे गहन आध्यात्मिक वाढ आणि वैयक्तिक परिवर्तनावर आधारित आहे. त्यांचा हा अनोखा दृष्टिकोन त्यांना व्यावसायिकांचे प्रशिक्षण अशा पद्धतीने देण्यास सक्षम करतो की ज्यामुळे त्यांच्या करिअरसह व्यक्तिगत जीवन देखील समृद्ध होते.

पारंपरिक व्यवसायिक कोचिंगपेक्षा वेगळा दृष्टिकोन - पारंपरिक व्यवसायिक कोचिंगच्या तुलनेत श्री. नाईकरे यांची पद्धत केवळ व्यवसायिक धोरणांवर केंद्रित नसून मानसिक आरोग्यालाही विशेष महत्त्व देते. ते सकारात्मक विचारसरणीला चालना देतात, ज्यामुळे व्यवसाय अधिक वेगाने आणि शाश्वत प्रगती साधू शकतो. त्यांच्या प्रशिक्षणामुळे बाह्य व्यवसायिक यश आणि अंतर्गत शांतता यामध्ये संतुलन राखता येते.

आपल्या करिअरमध्ये, श्री. नाईकरे यांना ३० प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या काही महत्त्वाच्या पुरस्कारांमध्ये यंग एंटरप्रेन्योर अवॉर्ड (२०२२), महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्ड (२०२३) आणि श्री महात्मा गांधी राष्ट्रीय सन्मान पुरस्कार (२०२३) यांचा समावेश आहे. हे पुरस्कार व्यवसाय आणि आध्यात्मिक मार्गदर्शन क्षेत्रातील त्यांच्या असाधारण योगदानाची पावती आहेत.

श्री. नाईकरे यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. एका सामान्य कुटुंबात जन्म घेतलेल्या या व्यक्तीने सुरुवातीच्या काळात अनेक अडचणींचा सामना केला. मात्र, त्यांची जिद्द, चिकाटी आणि ज्ञानाची ओढ यामुळे त्यांना वेगळे स्थान मिळाले. लहानपणापासूनच त्यांना व्यवसाय आणि अध्यात्म यांची आवड होती, त्यामुळे त्यांनी दोन्ही गोष्टींचे संमिश्रण करण्याचे मार्ग शोधले.

त्यांच्या जिज्ञासू वृत्तीमुळे आणि प्रचंड आवडीनं त्यांनी पाच महान गुरूंकडून मार्गदर्शन घेतले. त्यांनी केवळ आर्थिक लाभ मिळवण्याच्या पलीकडील यशाचा खरा अर्थ समजून घेतला. वर्षानुवर्षे समर्पित शिक्षण आणि सराव केल्यानंतर, त्यांनी देवदास ग्रुप ऑफ कंपनी ची स्थापना केली. ही कंपनी केवळ आर्थिक प्रगतीवर भर देत नाही, तर सर्वांगीण विकासासाठीही कार्य करते. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक व्यवसायांनी उंच भरारी घेतली, तर नैतिक आणि आध्यात्मिक मूल्येही जपली गेली.

अध्यापन तत्त्वज्ञान आणि प्रभाव - श्री. नाईकरे यांच्या शिकवणीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे ते सामान्य व्यक्तींना असामान्य व्यावसायिकांमध्ये परिवर्तित करण्याची क्षमता ठेवतात. त्यांच्या कोचिंग प्रोग्रॅममध्ये नेतृत्व विकास, वित्तीय साक्षरता, धोरणात्मक निर्णय घेण्याची कला आणि भावनिक बुद्धिमत्ता यासारख्या अनेक पैलूंवर भर दिला जातो. त्यांची शैली विशेषतः ध्यान, माइंडफुलनेस आणि प्राचीन आध्यात्मिक तंत्रे यांचे आधुनिक व्यवसायिक धोरणांमध्ये समावेश करून शिकवण्याची आहे. त्यामुळे त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये अधिक स्थिर, केंद्रित आणि आव्हानांना तोंड देण्याची क्षमता विकसित होते. त्यांच्या कार्यशाळा आणि सेमिनार्समध्ये हजारो व्यावसायिक, उद्योजक आणि विद्यार्थी सहभागी होतात, जे संतुलित आणि यशस्वी जीवन




जगण्याची आकांक्षा बाळगतात. श्री. नाईकरे यांचा विश्वास आहे की खरी यशस्वी व्यक्ती ही केवळ आर्थिक संपत्ती कमवणारी नसते, तर मानसिक शांती, उत्तम आरोग्य आणि सशक्त नातेसंबंध राखणारी असते. त्यांच्या प्रशिक्षण प्रोग्रॅम्समध्ये आत्म-जाणीव, वेळेचे व्यवस्थापन आणि नैतिक व्यवसाय पद्धतींवर भर दिला जातो. त्यामुळे त्यांच्या क्लायंट्समध्ये उल्लेखनीय सकारात्मक बदल दिसून येतात.

पुस्तके आणि प्रकाशन व्यवसायिक कोच आणि मेंटर असल्याव्यतिरिक्त, श्री. नाईकरे हे एक सुप्रसिद्ध लेखक देखील आहेत. त्यांनी दोन भाषांमध्ये १२ प्रेरणादायी पुस्तके लिहिली आहेत, जी वैयक्तिक आणि व्यवसायिक प्रगतीच्या विविध पैलूंवर आधारित आहेत. त्यांच्या पुस्तकांमध्ये आर्थिक स्वातंत्र्य, मानसिक स्पष्टता, नेतृत्व कौशल्ये आणि आध्यात्मिक प्रगती यांसारख्या विषयांचा समावेश आहे. त्यांचे कार्य व्यवसाय आणि आध्यात्मिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर मान्यता प्राप्त आहे, कारण त्यांच्या लेखनात व्यावहारिक ज्ञान आणि गहन तत्त्वज्ञानाचा समावेश असतो. त्यांच्या पुस्तकांना त्यांच्या साध्या पण प्रभावी संदेशांसाठी मोठ्या प्रमाणात प्रशंसा मिळाली आहे, आणि हजारो वाचकांनी त्यांच्या मार्गदर्शनामुळे आपली उद्दिष्टे साध्य केली आहेत.

## पान १ वरुन

### पोलीस प्रशासनाच्या ...

इरफान शेख हे गौणखनिज अवैध वाहतुक प्रतिबंधक पथकात कार्यवाही असतांना मौजे पाचनवडगाव शिवारामध्ये कुंडलिका नदीपात्रात रेतीने भरलेले दोन ट्रॅक्टर पकडले असतांना वाळु माफिया भरत्त कुटे रा. रोहणवाडी हा इसम सोबत १५ ते २० सहका-याना घेऊन आला. व पथकावर हल्ला केला व या हल्ल्यामध्ये इरफान शेख यांच्या नाकाला जबर मार लागला व ते गंभीर जखमी झाले. सदर प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र आरोपीना वेळेत अटक न केल्यामुळे त्यांना अटकपूर्व जामीन मिळण्याची संधी मिळाली. दिनांक ०४.०२.२०२५ रोजी ग्राम महसूल अधिकारी श्रीमती योगिता बारोटे ह्या मौजे गारखेडा येथे बैठे पथकात असतांना तेथे अज्ञात इसमाने येऊन पथकाने तेथुन निघुन जाण्याच्या उद्देशाने शिवीगाळ केली. तसेच दिनांक ०९.०२.२०२५ रोजी याच ठिकाणी महसूल पथकावर अज्ञात इसमाने दगडफेक केली ज्यामध्ये महसूल सेवक विष्णु मदन यांच्या खाजगी दुचाकीचे नुकसान झाले. यापूर्वी मा. अपर जिल्हाधिकारी, जालना यांचे पथकावर घनसावंगी तालुक्यातील अवैध वाळु वाहतुक प्रतिबंधक कारवाई करत असतांना मदयधुंद अवस्थेत असलेल्या २० ते २५ वाळु माफियांनी हल्ला करुन खाजगी वाहन फोडले व शिपाई श्री. अक्षय आडेकर यांना काठीने बेदम मारहाण केली. अशा स्वरुपाच्या अनेक घटना जिल्हयामध्ये घडलेल्या आहेत. याबाबत वेळोवेळी आपणास निवेदन देऊन पथकासोबत किमान नायब तहसिलदार दर्जाचा अधिकारी व संरक्षणासाठी ०२ शस्त्रधारी पोलीस कर्मचारी व शासकीय वाहन असल्याशिवाय पथकास कारवाई साठी बाध्य करु नये तसेच संरक्षण नसल्यास ग्राम महसुल अधिकारी व मंडळ अधिकारी गौण खनिज अवैध वाहतुक प्रतिबंधक पथकात कारवाईसाठी जाणार नाहीत. याबाबतचे निवेदन दिनांक २७.१२.२०२४ रोजी दिलेले आहे. व आपण सुध्दा आम्हाला याबाबत आश्वासन दिले होते. तरी सुध्दा या परिस्थितीमध्ये काहीही सुधारणा झालेली नसुन पथकास खाजगी वाहनाव्दारे विना संरक्षण जीव धोक्यात घालुन कारवाईसाठी जावे लागत आहे. वाळु माफियांकडून होत असलेल्या जीवघेण्या हल्ल्यामुळे कर्मचारी यांचे कुटुंबीय चिंतेत असून, अशा कारवाईसाठी जाण्यास विरोध होत आहे ज्यामुळे कर्मचारी यांच्या जीवनात कौटुंबिक कलह निर्माण होत आहेत. तसेच गौणखनिज प्रतिबंधक कारवाईसारख्या वेळखाऊ कामामुळे सामान्य नागरिक यांची दैनंदिन महसूली कामे प्रलंबित राहत असून, नागरिकांचा प्रशानसनावर रोष निर्माण होत आहे. तसेच मंठा व घनसावंगी तहसिलला शासकीय वाहन नाही ते तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे. गौण खनिजाची अवैध वाहतुक करणारी वाहने ही विना क्रमांकाची असल्याने वाहने पकडल्यास सदर वाहनांची ओळख पटविण्यास महसुल पथकास अडचणी येतात. अशा विना क्रमांकाच्या वाहनाव्दारे दिवस-रात्र वाहतुक केली जाते परंतु ठढज विभागाकडून कारवाई होताना दिसुन येत नाही. ठढज विभागाकडून अशा विना क्रमांकाच्या वाहनांवर कारवाई झाल्यास गौण खनिजाच्या वाहतुकीस निश्चीत पणे अटकाव होईल. ठढज विभागाकडून विशेष मोहीम स्वरुपात जिल्हयातील सर्व नदीकाठच्या गावांमधील ट्रॅक्टर, टिप्पर, हायवा, जेसीबी, लोडर इत्यादी वाहनांची तपासणी करुन विना क्रमांकाच्या वाहनांवर जप्तीची दंडात्मक कारवाई करण्यात यावी. महसुल पथकातील कर्मचारी यांचेवर वाळू माफीयांकडून होत असलेल्या जीवघेण्या हल्यामुळे कर्मचारी यांचे मनोबल खचलेले आहे व त्यांना आपल्या जिवीताची चिंता वाटत आहे. याचबरोबर कर्मचारी यांचे कुटूंब देखील सतत चिंतेत असते. महसुल पथकातील कर्मचारी यांचे स्वसंरक्षणासाठी त्यांना शस्त्र परवाना देण्यात यावा याबाबत जिल्हासंघटनेच्या वतीने आपणास भेटून आपणास विनंती करण्यात आली होती. जी आपण मान्य केली होती. त्यानुषंगाने तीन-चार तलाठी यांनी शस्त्र परवाना मिळण्यासाठी अर्ज केलेले आहेत परंतु पोलीस प्रशानाकडून अहवाल प्रलंबित असल्याने शस्त्र परवाना मिळण्यासाठी विलंब होत आहे. तरी सदरील प्रकरणात लक्ष घालावे व शक्य असल्यास आपल्या स्तरावरुन ग्राम महसुल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना शस्त्र परवाने देण्यात यावेत ही विनंती. गौण खनिज अवैध वाहतुक प्रतिबंधक पथकास किमान ०२ शस्त्रधारी पोलिस कर्मचारी यांचे संरक्षण, शासकिय वाहन व पथकासोबत किमान नायब तहसिलदार दर्जाचा अधिकारी नसल्यास आजपासून ग्राम महसुल अधिकारी व मंडळ अधिकारी गौण खनिज अवैध वाहतुक प्रतिबंधक पथकात कारवाईसाठी जाणार नाहीत असे जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले.

### योग्य नियोजनासह ...

ओळखून वर्तमानातील प्रत्येक क्षण उत्तम पद्धतीने जगावा. लिहिण्याच्या सवयीतून आपले मत व्यक्त होत असते.

अपयश हे जीवनात यशस्वी होण्यासाठीचे इंधन असते, असे सांगून प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी विद्यार्थ्यांना अपयशाची भीती न बाळगता त्याला आपला गुरू बनविण्याचा सल्ला दिला. एकाग्रतेसाठी ध्यान धारणेला महत्त्व असल्याचे सांगून निसर्ग, संतूलित आहार, नवनवीन तंत्रज्ञान, नेतृत्व करताना टीम वर्क आदी बाबींचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी निसर्गाची काळजी घेण्याचे आवाहन करून त्यांनी विद्यार्थ्यांना 'एक पेड मा के नाम' अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. पालकांनी विद्यार्थ्यांमधील क्षमता, त्यांच्या इच्छा ओळखावी आणि त्यांना प्रोत्साहन देऊन मदत करावी, असे आवाहन त्यांनी पालकांना केले.

**यशासाठी मनातील भीतीवर विजय मिळवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

आव्हाने ही सर्वांसमोर असतात. सकारात्मकतेने त्यावर मात करावी, विद्यार्थ्यांनी इतरांशी स्पर्धा न करता स्वतःशी स्पर्धा करावी आणि मनातील भीतीवर विजय मिळवावा. सरावाने सामान्य माणूस देखील असामान्य काम करून असामान्य बनू शकतो, यामुळे प्रधानमंत्री यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार स्वतःला ओळखून स्वतःमधील क्षमता वाढविण्याचा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, केवळ परीक्षा हेच अंतिम उद्दिष्ट नसून विद्यार्थ्यांनी जीवनातील आव्हानांशी कसा सामना करावा यादृष्टीने प्रधानमंत्र्यांशी झालेला संवाद हा अतिशय उपयुक्त आहे. प्रधानमंत्री अतिशय संघर्षमय जीवनातून यशस्वी झाले असून त्यांनी जगात भारताची नवी ओळख तयार केली आहे. या अनुभवातून विद्यार्थ्यांना जीवनाचे ज्ञान मिळावे, हा या कार्यक्रमाचा हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एसएनडीटी महाविद्यालयाच्या डॉ.अदिती सावंत यांच्या कॉटन या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

# महापुरुषांविषयी अशोभनीय वक्तव्य केल्याप्रकरणी राहुल सोलापुरकर यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार कारवाई करा

## चंद्रकांत रत्नपारखे यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महापुरुषांविषयी अत्यंत अश्लिल व अशोभनीय वक्तव्य केल्याप्रकरणी अभिनेता राहुल सोलापुरकर यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार कारवाई करावी व त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी जालना जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन शासकीय समिती सदस्य चंद्रकांत नाथराव रत्नपारखे यांनी जालना जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.



यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अभिनेता राहुल सोलापुरकर नावाच्या इसमाने छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेउकर या दोन महापुरुषांविषयी अत्यंत अश्लिल व अशोभनीय वक्तव्य केले आहे. त्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यांच्या वक्तव्यामुळे दंगलीची परिस्थिती तयार निमर्णि झाली आहे. व अनुसूचित जातीच्या लोकांच्या मनाला पिडा झाली आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात ॲट्रॉसिटी कायद्यानुसार कारवाई करून त्यास तात्काळ अटक करण्यात यावी.

महापुरुषांच्या अवमानाची राज्यात मालिका सुरु झाली आहे. त्या प्रकरणी राज्य सरकारने श्वेतपत्रिका काढावी व ती जनतेत प्रकाशित करावी व आतापर्यंत जे अवमानाचे प्रकार झाले आहेत. त्याप्रकरणी सरकारने काय कार्यवाही केले आहे? त्याची माहिती सरकारने जनतेस द्यावं, सततच्या असंसदीय वक्तव्यामुळे समाजात तेढ निर्माण होत आहे. त्यामुळे अशांविरोधात उपाययोजना म्हणून सरकारने महामानव सन्मान व अवमान विरोधी कायदा करावा व तो कायदा हा देशद्रोह या कलमात जोडावा अशी मागणी निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे.

निवेदनावर महाराष्ट्र युवक कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस शेषराव जाधव, जालना जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन शसकीय समितीचे सदस्य चंद्रकांत रत्नपारखे, अच्युतराव मोहिते, भाऊसाहेब रत्नपारखे, दिग्विजय धांडगे, दिलीप गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# घन कचरा व्यवस्थापन विभागातील सहाय्यक अभियंता गेली अनेक वर्षे एकाच ठिकाणी कसे?

## केतन भोज यांची चौकशीची मागणी

**घाटकोपर । प्रतिनिधी** - मुंबई महानगरपालिकेच्या एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागात काही अनागोंदी प्रकार सुरू आहे असा संशय काही सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करत आहे. याआधी ही घाटकोपर पश्चिम विभागातील सर्व प्रभागात स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानाअंतर्गत असलेल्या वस्ती स्वच्छता योजना आणि डीप क्लीनिंग योजनेचे सर्वच ठिकाणी तीनतेरा वाजलेले दिसत आहे.अशातचं या घन कचरा व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक अभियंता हे गेली अनेक वर्षे म्हणजे २०१३ पासून मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागात सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) या पदावर कार्यरत आहे.शासन अधिसूचना दि.२५.५.२००६ नुसार विधिनियम विषयक २००५ मधील प्रकरण दोन,कलम ३(१) अन्वये सेवेतील अधिकारी यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षाचा आहे.मग हे घन कचरा व्यवस्थापन एन विभागाचे सहाय्यक अभियंता गेली बारा वर्षे या एकाच ठिकाणी काम कसे काय करत आहे.याला कोणाचे अभय आहे?तरी आता सहाय्यक अभियंता(घ. क.व्य.)यांच्या कार्यकाळाची व यांच्या विभागाच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ते केतन भोज यांनी यावर आवाज उठवला असून ते याबाबत राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्याचे नगरविकास मंत्री, मुंबई महानगरपालिकेचे मुख्य आयुक्त तथा प्रशासन तसेच राज्याचे मुख्य सचिव, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त , नगर विकास विभागाचे प्रधान सचिव, सहाय्यक आयुक्त एन विभाग यांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार दाखल करणार आहेत. आणि या सर्व प्रकरणाची चौकशीची मागणी करणार आहेत.



# प्रत्येक नोटरी विधीज्ञाच्या मागे संघटना ठामपणे उभा राहू - ॲड. सय्यद सिकंदर अली



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा वकील संघ तथा महाराष्ट्र आणि गोवा नोटरी संघटनेच्यावतीने भारत सरकार नवनियुक्त नोटरी, ज्येष्ठ नोटरी विधीज्ञ तथा विधीज्ञासाठी कायदेशीर शिबीराचे आयोजन दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा वकील संघाच्या कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी नोटरी विधीज्ञांना ज्येष्ठ विधीज्ञ श्री नितेशजी ललवाणी यांनी नोटरी दस्त नोंदणी बाबत मौल्यवान मार्गदर्शन केले. प्रत्येक नोटरी दस्ताला २५ रुपयाचे नोटरी मुद्रांक टिकीट लावणे व त्याची रजिस्टरमध्ये रितसर खतवणी करणे नियमानुसार गरजेचे आहे. प्रत्येक दस्त करतांना सर्व पक्षकार यांची शहनिशाकरुन त्यांची स्वाक्षरी रजिस्टरवर घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्र आणि गोवा नोटरी संघटनेचे अध्यक्ष अँड सय्यद सिकंदर अली यांनी मार्गदर्शन करतांना सांगीतले की, दस्त दक्षतेने करा तथा नोटरी वकीलांसाठी नियमीत कार्यशाळा व सुविधा मिळण्यासाठी संघटना प्रयत्नशिल असून प्रत्येक नोटरी विधीज्ञामागे संघटना ठामपणे उभी असल्याचे ग्वाही सुद्धा दिली.

यावेळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. विकास पिसुरे, बारकाऊन्सीलचे समन्वयक ॲड. लक्ष्मण उढाण, उपाध्यक्ष ॲड. कामरानखान, सचिव ॲड. नंदकिशोर पुंगळे, सहसचिव ॲड. शरद कुलकर्णी, जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. बाबासाहेब इंगळे, मुख्य लोकअभिरक्षक ॲड. महेश वाघुंडे, ॲड. महेश धन्नावत, ॲड. आनंद झा, प्रसिद्धी प्रमुख ॲड. अरविंद मुरमे आदी विधीज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालन्याच्या वतीने नवोपक्रम स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

# हरिदास निकम नळणी सर्वप्रथम

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** राज्यात दरवर्षी शिक्षकांची नवोपक्रम स्पर्धा राबविल्या जाते. शिक्षकांमध्ये जाणीव जागृती आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शिक्षक राबवित असलेल्या विविध उपक्रमांची दखल घेतल्या जाते. तसेच त्या संदर्भात नवोपक्रम स्पर्धा राबविल्या जाते. यावर्षी सुद्धा राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा राबविल्या गेले. या स्पर्धेत माध्यमिक गटातून पीएमश्री शाळा नळणी येथील नवोपक्रम, विविध उपक्रम राबवणारे शिक्षक हरिदास विनायकराव निकम यांचा उपक्रम जिल्हास्तरावरून सर्वप्रथम आला आहे. त्यांना नुकतेच एका समारंभामध्ये बक्षीस वितरण करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये प्रदीप घाटेशाही त्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. नितीन रोहकले या शिक्षकांनी प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक मिळवला आहे. संतोष खरात यांनी तृतीय क्रमांक पटकावला आहे. श्रीमती नेता आरसुळे यांनी चौथा क्रमांक पटकावला आहे. श्रीमती वर्षा घाडगे यांनी पाचवा क्रमांक पटकावले आहे, श्रीमती कावेरी वैद्य यांनी उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले आहे. श्री स्वप्निल साबणे यांनी उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले आहे. श्री सतीश कंडारे आणि माध्यमिक विभागातून द्वितीय क्रमांक मिळवला आहे, विलास टकले यांनी तृतीय क्रमांक मिळवला आहे. या सर्वांना जालना डायट येथील प्राचार्य राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली नवोपक्रम स्पर्धेचे प्रमुख डॉक्टर श्रीहरी दराडे यांनी मार्गदर्शन केले आहे. या बक्षीस वितरण कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर संजय येवते, डॉक्टर प्रमोद कुमावत, डॉक्टर योगेश्वर जाधव, डॉक्टर सूर्यवंशी, समन्वयक तथा नवोपक्रम स्पर्धा प्रमुख डॉक्टर श्रीहरी दराडे, डॉक्टर प्रेरणा मोरे मॅडम, डॉक्टर नीलोफर पटेल,तसेच शिक्षक सक्षमीकरण प्रशिक्षणातील रिसोर्स पर्सन प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख, प्राध्यापक विवेक कुलकर्णी, श्री प्रदीप घाटे शाही, गणेश खरात, हरिदास निकम, डॉक्टर शिवनंदा मेहत्रे, श्रीमती करुणा हिवाळे, श्रीमती सुजाता भालेराव, यांची आवर्जून उपस्थिती होती. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रदीप घाटे शाही यांनी केले.



# अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस पदे मानधनावर भरण्यात येणार आहेत. अर्जाचा विहीत नमुना ग्राम पंचायत व अंगणवाडी केंद्रात उपलब्ध करुन दिलेला आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प-२ अंतर्गत ५९ पदे भरण्यात येणार आहेत. तरी किमान बारावी उत्तीर्ण वय १८ ते ३५ दरम्यान असलेल्या स्थानिक महिला अर्जदारांनी शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आपले अर्ज जालना येथील पंचायत समितीच्या परिसरातील एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प-२ येथे सादर करावेत, असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी, जालना यांनी केले आहे.

# भारतीय सैन्य दलातून निवृत्तीनंतर स्वगावी परतलेल्या सैनिकाचा घोड्यावर मिरवणूक काढून स्वागत

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील तळणी येथील भारतीय सैन्य दलातून निवृत्तीनंतर स्वगावी परतलेल्या सैनिकांचे ग्राम स्थांनी अनोख्या पद्धतीने जल्लोषात स्वागत केले. तळणी येथील शेतकरी पूत्र दिंगाबर अरुण सरकटे हा २ फेब्रुवारी रोजी भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त झाला. दिंगाबर सरकटे यांनी १६ वर्ष जम्मू -कश्मीर , पंजाब , राजस्थान व आसाम या राज्यात देश सेवा बजावली आहे. ते आय बी ( इंटेलिजन्स ब्युरो ) म्हणून कर्तव्य बजावले . ९ फेब्रुवारी रोजी निवृत्तीनंतर प्रथमच जन्मभुमीत आलेल्या जवानांची तळणीकरांनी बस स्टँड चौक ते हनुमान मंदिरापर्यंत घोड्यावर बसवून ढोल, ताशे व बँड पथकांच्या गजरात राष्ट्रभक्तीपर गीतांचा निनादात त्यांच्या राहत्या घरापर्यंत वाजत,गाजत मिरवणूक काढण्यात आली. गल्लोगल्ली गावातील महिलांनी रांगोळी काढून औक्षण करीत स्वागत केले. यादरम्यान बस स्टँडवर माजी सैनिक हरिभाऊ सोनुने , दत्ता देशमुख व विष्णू मुदळकर यांच्याही सत्कार करण्यात आला. यावेळी बस स्टँड ते गावांत ठिकठिकाणी सर्व स्तरातील मान्यवरांनी सत्कार झाला. गावकऱ्यांकडुन झालेला अनोखा सत्कार पाहून दिंगाबर सरकटे भारावून गेले. यावेळी सत्काराला उत्तर देतांना ते म्हणाले की , सेवानिवृत्ती नंतरचे माझे जीवन गावातील तरुणांना देशसेवा , राष्ट्रभक्ती , सामाजिक बांधिलकी व एकोपा निर्माण करण्यासाठी कार्य करीन , असे सांगितले. कार्यक्रमाला गाव व परिसरातील बहूसंख्य नागरीक , महिला , विद्यार्थी , व्यापारी , पत्रकार , माजी सैनिक , राजकीय पदाधिकारी असा प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# अरविंद केजरीवालना अनपेक्षित धक्का

भाजपला दिल्ली विधानसभा जिंकून देण्याचे श्रेय पंतप्रधान मोदी यांनाच जाते. मतदानाच्या टक्केवारीत मोठा फरक पडलेला दिसत नाही.समतोल राखला गेला आहे. कॉंग्रेस मुळे आम आदमी पार्टीला काही प्रमाणात झटका बसला त्याला केजरीवाल यांचा अतिआत्मविश्वास कारणीभूत आहे. कारण मोदी हे दूरदृष्टीचे नेते आहेत. केजरीवाल यांनी जेलमधून सुटून आल्यानंतर मोदी शहा भाजपवर जे शरसंधान करतांना पुढील पंचवीस वर्षात मोदी दिल्लीत जिंकू शकत नाही, हा पराकोटीचा अहंकार मोडून काढण्यासाठी मोदींनी शीश महालचा मुद्दा, गंगेच्या पाण्याची अवहेलना, मद्य घोटाळा, रस्त्यांची डागडुजी करण्यात अपयशाचा पाढा वाचत जे रान उठवले त्याला प्रत्युत्तर देण्यात केजरीवाल कमी पडले. आपला आपदा म्हणत मोदींनी मतदारांच्या मनात संशय निर्माण केला. भाजपची सर स्थरावरील यंत्रणा हि जिंकण्यासाठीच लढत होती. त्याला शिस्तबद्ध आरएसएसच्या फळीची मोठी मदत झाली. भाजपने हरियाणा पाठोपाठ महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना राबवून महाराष्ट्र जिंकला तसाच २५०० रु. लाडकी बहीण योजना आणून मतदार भाजपकडे वळवले. त्याचा परिणाम भाजपच्या जिंकण्यात झाला हे नाकारून चालणार नाही. भाजपची जिंकण्याची रणनीती काय असू शकते हे उच्च शिक्षित अनुभवी केजरीवाल याना माहित असूनसुद्धा अति आम विश्वासाने व मतदारांना गृहीत धरून स्वतःच्या पायावर कुहाड पाडून घेतली.



बीजेपी आपल्या सुनियोजित देशावर एकहाती सत्ता आणण्याच्या मनसुभ्यात यशस्वी होताना दिसते. केजरीवाल यांनी अहंकाराला तिलांजली देत, काळाची पाऊले ओळखत जे आण्णा हजारेंचे खंदे समर्थक असणारे आणि आम आदमी पक्षापासून दुरावलेले दुखावलेले योगेंद्र यादव, प्रशांत भूषण, अंजली दमानिया व अन्य सचोटीचे प्रामाणिक नेते कार्यकर्ते ह्यांना काळाची पाऊले ओळखत पक्षात मानाने परत बोलावून पक्ष सक्षम करण्यासाठी, काही महत्वाची सूत्रे हाती देऊन बीजेपीची सुरु झालेली वाटचाल रोखण्यासाठी राष्ट्रहितासाठी मनधरणी करायला हरकत नाही. सक्षम विरोधी पक्ष असणे हि देशाची, लोकशाहीची गरज आहे.

**यशवंत चव्हाण, सीबीडी बेलापूर**
**मो.नं.९९२०७७६२७७**

# परीक्षेला जाताना घ्यावयाची काळजी आणि परीक्षेचे महत्व - निलेश कंकाळ

फेब्रुवारी/ मार्च २०२५ ची शालांत म्हणजेच महाराष्ट्र स्टेट बोर्ड ची इयत्ता १० आणि १२ वि ची परीक्षा काही दिवसांवर येऊन पोचलेली आहे तुम्ही खूप चांगल्या प्रकारे आणि योग्य पद्धतीने शाळेत कॉलेजला शिक्षण घेऊन याची जय्यत तयारी केलेली आहे परीक्षेला जाताना सहजतेने आणि योग्य निर्णय घेत सामोरे जावे लागते कारण ही घटक चाचणी नसते तर ही तुमच्या जीवनाला, आयुष्याला कलाटणी देणारी परीक्षा असते भीती न बाळगता या परीक्षेला सामोरे जाताना काही गोष्टी लक्षात ठेवायला पाहिजे

१) विद्यार्थ्यांच्या जीवनातील १० वी पहिलीच म्हणजे सुरुवतीची आणि १२ वी आयुष्याला कलाटनी देणारी अति महत्त्वाची परीक्षा असते.

२) तुम्ही केलेल्या अभ्यासाची उजळणी करावी , के कमी ५ तरी नमुना उत्तर पत्रिका सोडवल्या असतील त्याचे वाचन आणि सराव करावा.

३) परीक्षेच्या आदल्या दिवशी जास्त वेळ जागरण करू नये तसेच पुरेशी झोप घ्यावी. ४) जे प्रश्न आतापर्यंत बोर्ड परीक्षेत आलेले आहेत त्याचा सराव करावा. ५) कृतीपतिका तुम्हाला मिळाल्यावर प्रथम त्याचे वाचन करा सुरुवात करण्यास घाई करू नका. ६) सोपे प्रश्न, कृती यावर आधारित वाटणारे प्रश्न पाहिले सोडवा म्हणजे बाकीच्या प्रश्नासाठी पुरेसा वेळ मिळेल. ७) नवीन प्रश्न नवीन पानावर सुरू करावा आणि शक्यतो खडातोड टाळावी. ८) परीक्षेच्या काळात आणि पेपरच्या दिवशी चिडचिड करू नका किंवा घरी भांडणे करू नये शक्यतो गाडी किंवा वाहन चालवू नये. ९) परीक्षा केंद्रावर पहिल्या पेपरला सकाळी १०:१५ वाजेपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करा कारण १०.३० रिपोर्टिंग टाइम आहे. १०) मोबाईल, कॅल्क्युलेटर , स्मार्ट वॉच अशा इलेक्ट्रॉनिक वस्तू परिक्षेच्या काळात सोबत आणु नये. ११) हॉलतिकिट, ओळखपत्र, आधार कार्ड सोबत ठेवावे. १२) उत्तर पत्रिका मिळाल्यानंतर बारकोड स्टिकरवर आपलाच बैठक क्रमांक आहे का तपासून घ्यावा. १३) फॉर्म नंबर दोन वर आपला बैठक क्रमांक च्या पुढे सही करावी. १४) प्रश्नाचे दोन वेळेस वाचन करून मगच उत्तर लिहिण्यास सुरुवात करावी. १५) प्रत्येक प्रश्न संपल्यानंतर रेषा मारावी कृती असेल तर आयत किंवा चौकोन करावा. १५) वेळेचे नियोजन लक्षात ठेवून शेवटी पंधरा मिनिटे उत्तर पत्रिका तपासण्यासाठी ठेवावा. १६) पेपर संपल्यावर घरी जावे विनाकारण मुलांशी मुलींशी चर्चा करू नये वेळ वाया जातो. १७) उन्हाळ्याचे दिवस असल्याने सोबत पाण्याची बॉटल घ्यावी किंवा ग्लूकोज च पानी बॉटल मध्ये घेऊन ते सोबत ठेवावे. १८) तुमचा शालेय / कॉलेजच्या स्तरावर खूप सराव झालेला असतो त्यामुळे तुम्हाला बोर्डचा पेपर देताना नवीन वाटणार नाही किंवा मनात भीती बाळगायची गरज नाही. १९) अक्षर स्वछ आणि सुंदर काढून पूर्ण पेपर वेळ नियोजन करून सोडवावा नंतर जास्तीचे प्रश्न सोडवावेत. २०) भयमुक्त, आनंददायी परीक्षा द्यावी. २१) गणित विज्ञान आणि भूगोल या विषयाच्या संदर्भात आकृत्या ,नकाशे आणि आलेख अचूक काढावे. २२) बऱ्याच ठिकाणी दहावीच्या किंवा १२ वी च्या गुणाणवर जागा निघतात किंवा अनेक कोर्स असतात ते लक्ष समोर ठेवून अभ्यास करावा.



सर्व पालकानी परीक्षेच्या काळात आपल्या पाल्याची शारीरिक व मानसिक काळजी घ्यावी.

भारत पेट्रोलियमच्या फ्युलिंगचा महाउत्सव स्पर्धा; जालनातील युवक ठरला प्रथम विजेता

# विजेता आर्शदराजला मिळाली महिंद्रा थार जीप

**जालना । प्रतिनिधी -** भारत पेट्रोलियम कंपनीने आपल्या पेट्रोलची विक्री वाढण्यासाठी फ्युलिंगचा महाउत्सव स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धे अनर्गत २०० रुपयांचे पेट्रोल वाहन चालकांनी भरायचे होते. या महाउत्सव स्पर्धेचा प्रथम विजेता जालना शहरातील आर्शदराज आयुबराज पठाण ठरले आहेत. स्पर्धेचे प्रथम बक्षीस असलेली महिंद्रा थार जीप त्यांना मिळाली आहे.

भारत पेट्रोलियमच्यावतीने संपूर्ण देशात २२ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबर २०२४ दरम्यान या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ग्राहकांनी २०० रुपयांचे पेट्रोल भरून पेट्रोल पंपावरील क्यूआर कोडवर स्कॅन करायचे होते. या स्पर्धे अंतर्गत देशभरात तब्बल ७० लाख ग्राहकांनी सहभाग घेतला होता. जालन्यातील देऊळगावराजा रोडवरील लक्ष्मीचंद बेचरदास पेट्रोल पंपावर सुद्धा स्पर्धेच्या ४५ दिवसात २५ हजार ग्राहकांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी आर्शदराज आयुबराज पठाण रा. रहेमानगंज जालना यांचा देशभरात प्रथम क्रमांक आला आहे. त्यांना कॅम्पनीतर्फे महिंद्रा थार जीप देण्यात आली आहे. यावेळी लक्ष्मीचंद बेचरदास पेट्रोल पंपाचे मुकेशचंद्र भायाणी, जीतेश भायाणी, आशीष भायाणी सी ए बिजल भायाणी, गौरव हेड रिटेल वेस्ट,, सौरव मुख़र्जी चीफ मैनेजर रिटेल इनिशिएटिव , महाराष्ट्र और गोवा, सुधीर कनाला क्षेत्रीय प्रबंधक रिटेल अहमदनगर, अमित भास्कर, क्षेत्रीय प्रबंधक रिटेल जळगांव, कीर्ति सिंधानी, क्षेत्रीय समन्वयक अहम दनगर, धया हम्बीर वरिष्ठ विक्री अधिकारी जालना, अभिषेक कुमार, इंजीनियरिंग अधिकारी, जालना आदींची उपस्थिती होती.




# मोतीबिंदूचे निदान झालेल्या ४४ जणांवर होणार मोफत शस्त्रक्रिया

## जालना लॉयन्स क्लबच्या मोफत नेत्र तपासणी शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी-** लॉयन्स क्लब जालनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या रविवारी मोफत नेत्र तपासणी आणि मोफत म ोतीबिंदू शस्त्रक्रिया हा स्थायी राबविण्यात येत असून, त्या अंतर्गत घेण्यात आलेल्या शिबिरात १०२ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली असता, ४४ जणांना मोतीबिंदूचे निदान झाले आहे.

दि. ९ फेब्रुवारी देऊळगाव राजा रोडवरील सचदेव हॉस्पिटलमध्ये हे शिबिर घेण्यात आले. शिबिराच्या उद्धाटनप्रसंगी लायन्स क्लब लचे सदस्य डॉ. गिरीश पाकणीकर, अतुल लड्ढा, बालाप्रसाद भक्कड, द्वारकादास मुदंडा, पी. के. खरात, बळीराम बेंद्रे आदींची उपस्थिती होती.



एकूण १०२ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४४ जणांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले. दृष्टीदोष आढळून आलेल्या १६ गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले. मोतीबिंदू आढळलेल्या ४४ जणांवर चिकलठाणा येथील लॉयन्स हॉस्पिटलमध्ये मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

लायन्स क्लब जालनातर्फे गेल्या सात वर्षांपासून हे शिबिर अखंडपणे आयोजित केले जात असून, हजारो नागरिकांना लाभ मिळाला आहे. समाजाच्या आरोग्यसेवेसाठी लायन्स क्लब जालना सातत्याने पुढाकार घेत असून, गरजू नागरिकांना दृष्टी प्रदान करण्यासाठी ही मोफत सेवा अविरत सुरू राहणार असल्याचे क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्डा यांनी सांगितले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.